कापुरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ११२ /२०२५ दि. ०४/०६/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत मे. Reliance Astaldi Joint Venture या कंपनी कडून मेट्रो ४ चे काम करण्यात येत असुन त्यांचेकडुन **नळपाडा पाईपलाईन येथे पिलर क्रमांक P27 – P28 व P28 – P29** यावर चार लोखंडी गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. सदरवेळी ५५० टनी दोन क्रेन ठाणे घोडबंदर या स्लीप रोडवर नळपाडा पाईप लाईन येथे उभ्या करण्यात येणार आहेत. त्यामुळे ठाण्याकडुन घोडबंदरकडे स्लीप रोडवरुन जाणारी सर्व प्रकारची वाहतूक पुर्णपणे बंद करुन वाहतूक पर्यायी मार्गाने वळवावी लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – **१)** ठाणे घोडबंदर स्लीप रोडवरुन कापुरबावडी सर्कल मार्गे घोडबंदरचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कापुरबावडी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – **अ)** सदरच्या मार्गावरुन जाणारी सर्व प्रकारची वाहने ही कापुरबावडी सर्कल येथुन ब्रिज खालुन नळपाडा सिग्नल येथुन उजवीकडे वळण घेवुन, नंदीबाबा चौक, ढोकाळी मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सदर मार्गावरुन जाणारी सर्व प्रकारची वाहने ही रवि स्टील नाका येथुन डावे बाजुस वळण घेवुन पोखरण रोड नं.२, गांधी चौक येथुन उजवे बाजुस वळण घेवुन खेवरा सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **२)** नळपाडयातुन बाहेर येवुन तत्वज्ञान विद्यापीठ मार्गे घोडबंदरचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नळपाडा पाईप लाईन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर मार्गावरुन जाणारे सर्व प्रकारची वाहने नळपाडा पाईप लाईन येथुन यु टर्न घेवुन नळपाडा येथुन इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक ०७/०६/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दिनांक ०८/०६/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. पावेतो व दिनांक ०८/०६/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दिनांक ०९/०६/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

CamScanner

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी वाहतूक उप विभाग
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner